• मन्ना डे यांचा आवाज पहिल्यांदाच *उजाला*द्वारे शम्मी कपूरच्य
नायक अवतरला • *छोटी बहन*द्वारे शंकर-जयकिशन

उजाला(१९५९):

राज कपूरप्रमाणेच ज्याच्या चित्रपटांशी शंकर-जयकिशन यांच्या संगीताचा सूर जुळला होता असा दुसरा अभिनेता म्हणजे शम्मी कपूर. १९५९ च्या *उजाला* या चित्रपटात हा सूर प्रथम जुळला. शंकर-जयकिशनननी संगीतबद्ध केलेला हा शम्मी कपूरचा पहिला चित्रपट. १९५१च्या *रेल का डिब्बा*पासून रफी शम्मी कपूरसाठी गात होता. त्यानंतर मुकेश, तलतदेखील शम्मी कपूरसाठी गायले. तरीही १९५८ पर्यंत मन्ना डेचा आवाज मात्र शम्मी कपूरच्या गळ्यापासून एकदम दूर होता. शंकर-जयकिशनननी हा आवाज १९५९च्या *उजाला*मध्ये सर्वात प्रथम शम्मी कपूरच्या गळ्यापर्यंत पोहोचवला. आणि तोदेखील एकदम चार गाण्यात. या चार गाण्यांपैकी 'सूरज जरा आ पास, आज सपनों की रोटी पकायेंगे...' व 'अब कहाँ जाए हम ये बता ये जमीं...' ही दोन गाणी मन्ना डेने या चित्रपटात कोरसबरोबरच गायली होती. 'झुमता मौसम मस्त महिना चांद सी गोरी एक हसीना...', 'या अल्लाह दिल ले गयी...' हे गाणे लताबाईंच्याबरोबर आणि 'छम छम लो सुनो छम छम छुमक छुमक रात चले...' हे एक गाणे लताबाई व कोरस यांच्याबरोबर. या गाण्यातील 'या अल्लाह दिल ले गयी...' या गाण्यात मन्ना डेचा आवाज खास शम्मी कपुरी ढंगाच्या अभिनयाने फुलला होता. यामुळे हे गाणे एक टिपिकल शम्मी कपुरी गाणं बनून गेलं होतं.


१९६८च्या *ब्रह्मचारी* या चित्रपटातील शम्मी कपूरची भूमिका लहान मुलांच्या घोळक्यात वावरणाऱ्या नायकाची होती. *उजाला*मधील त्याची भूमिका काहीशी अशीच होती. आणि या चित्रपटात मन्ना डेने त्याच्यासाठी गायलेल्या 'सूरज जरा आ पास...' व 'अब कहाँ जाए हम...' या गाण्यात लहान मुलांच्या विषयी अनुकंपा होती. मन्ना डेबरोबर मुकेशचा आवाजदेखील या चित्रपटात होता दोन गाण्यात. या दोन गाण्यांपैकी 'दुनिया वालों से दूर जलनेवालो से दूर...' हे गाणे मुकेशने या चित्रपटात लताबाईंच्याबरोबर गायले होते. तर 'यारो सुरत हमारी पे मत जाओ...' हे गाणे रफीबरोबर गायले होते. आणि ते शम्मी कपूर व राजकुमार यांच्यावर चित्रित करण्यात आले होते.

माला सिन्हा या चित्रपटाची नायिका होती. पण कुमकुम त्या काळात आपल्या चित्रपटातील एक अशी अभिनेत्री बनली होती की, अनेकदा गाण्याच्या बाबतीत ती चित्रपटाच्या नायिकेवर भाव खाऊन जायची. माला सिन्हा *उजाला*ची नायिका असली तरी कुमकुम या चित्रपटात तिच्यावर अशीच भाव खाऊन गेली होती. नायिका असूनही माला सिन्हाच्या वाट्याला या चित्रपटात एकही सोलो गाणे आले नव्हते. लताबाईंनी मन्ना डे, मुकेशबरोबर गायिलेली दोन द्वंद्वगीतंच तिच्या वाट्याला आली होती. लताबाईंनी गायलेली 'तेरा जलवा जिसने देखा वो तेरा हो गया...' व 'ओ मेरा नादान बालमा न जाने जी की बात...' ही दोन सोलो गाणी या चित्रपटात होती. या दोन्ही गाण्यांच्या चालीत शंकर-जयकिशनननी एक द्रुतलय ठेवली होती. आणि ही द्रुतलय पकडूनही कुमकुमने या गाण्यावर अदाकारी केली असल्यामुळे पडद्यावर ही गाणी चांगलीच खुलली होती. ही दोन्ही गाणी आणि याचबरोबर या चित्रपटातील 'झुमता मौसम मस्त महिना...' हे आणखी एक गाणे हसरतनी लिहिले होते. बाकीची गाणी शैलेंद्रनी. १९५९च्या या *उजाला*पूर्वी १९४२ साली *उजाला* नावाचा एक चित्रपट निघाला होता. त्या *उजाला*त पृथ्वीराज कपूर नायक होता. त्यानंतरच्या दुसऱ्या *उजाला*त त्यांचा पुत्र शम्मी कपूर.

लव्ह मॅरेज(१९५९):

देव आनंदची भूमिका असलेल्या अनेक चित्रपटांचे संगीत नियोजन शंकर-जयकिशन यांनी केले. याची सुरुवात १९५९च्या *लव्ह मॅरेज* या चित्रपटापासून झाली. शंकर-जयकिशनननी संगीतबद्ध केलेला देव आनंदचा हा पहिला चित्रपट.

सुबोध मुखर्जी या चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक होते. १९५५च्या फिल्मीस्तानचा *मुनीमजी* त्यांनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट आणि त्यानंतरचा दुसरा चित्रपट १९५७चा *पेईंग गेस्ट*. या दोन्ही चित्रपटांनी चांगलं यश मिळवलं होतं. यामुळे त्यानंतर निर्मितीक्षेत्रात पदार्पण करायचं त्यांनी ठरवलं. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या *मुनीमजी*, *पेईंग गेस्ट* या सुरुवातीच्या दोन चित्रपटाचा नायक होता देव आनंद. *मुनीमजी* व त्यानंतरच्या *पेईंग गेस्ट*च्या यशामुळे तो त्यांना एकदम लकी वाटू लागला होता. यामुळे सुबोध मुखर्जी प्रॉडक्शन ही स्वतःची चित्रसंस्था स्थापन करून *लव्ह मॅरेज* हा आपला पहिला चित्रपट निर्माण करताना या चित्रपटात त्यांनी पुन्हा देव आनंदलाच घेतला.





अव्वल नंबर, *ऑल राऊंडर* या चित्रपटातला क्रिकेटर नायक तुम्हाला माहिती असलेला एक नायक आहे. संदीप पाटील (*कभी अजनबी थे*) चित्रपटात खोल क्रिकेट खेळाडूच्या भूमिकेत चमकला आहे. १९५९च्या *लव्ह मॅरेज* या चित्रपटातच क्रिकेटर नायक सर्वात प्रथम हिंदी चित्रपटात आला. तद्पूर्वी मा. विनायकनी एका मराठी चित्रपटात क्रिकेटर नायक आणला होता. हा चित्रपट म्हणजे १९४३ चा *चिमुकला संसार*. मा. विनायकनी या चित्रपटात क्रिकेटर नायकाची भूमिका केली होती.

*लव्ह मॅरेज*चं आणखी एक वैशिष्ट्य होतं. क्रिकेट खेळावरचं गाणं याच चित्रपटाने आपल्या चित्रपटात सर्वात प्रथम आणलं. या गाण्याचे बोल होते 'टी ने खेला आज शी से क्रिकेट मॅच..' रफीने हे गाणे गायले होते. या चित्रपटात देव आनंदची सारी गाणी शंकर-जयकिशनननी रफीच्या आवाजातच फुलवली होती. क्रिकेट खेळावरील गाण्याबरोबर या

गळयापर्यंत पोहोचला ● लव्ह मॅरेजमध्ये पहिल्यांदाच क्रिकेटर यांचा पहिल्यांदाच दाक्षिणात्य बॅनरमध्ये शिरकाव झाला

□ इसाक मुजावर

चित्रपटातील 'कहाँ जा रहे थे, कहाँ आ गये हम...''टीन कनस्तर पीट पीट कर...'या गाण्याचे वैशिष्ट्य हे होते की, गाण्यात चित्रपट संगीताच्या खालावत चाललेल्या दर्जाची खिल्ली उडवताना मयगलची थोरवी गाण्यात आली होती.

तीन गाणी एकट्याने गात असताना रफीने या चित्रपटातील 'धीरे धीरे चल चांद गगन में...' हे गाणे लता मंगेशकर यांच्यावरोबर गायले होते. आणि 'दिल से दिल टकराए, फिर दोनो घबराए...' हे गाणे गीता दत्त व कोरसबरोबर. हे गाणे या चित्रपटात नृत्य



शंकर-जयकिशन

दिग्दर्शक सूर्यकुमार व नृत्यतारका हेलन यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. गीता दत्तने रफीबरोबर एक गाणे गात असताना या चित्रपटातील 'करीब आओ न तडपाओ...' हे गाणे एकटीने गायले होते.

लताबाईंनी रफीबरोबर गायलेले 'धीरे धीरे चल चांद गगन में...' हे गाणे या चित्रपटात देव आनंद व माला सिन्हा यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. माला सिन्हा या चित्रपटाची नायिका होती आणि देव आनंदवरोबर तिचा हा पहिलाच चित्रपट होता. 'हम जान गए सरकार तुम लाख करो इन्कार...' व 'कहे झुम झुम रात ये सुहानी...' ही या चित्रपटातील दोन गाणी लतावाईंच्या आवाजात होती. आणि ती माला सिन्हावर चित्रित करण्यात आली होती. 'ही ने खेला...', 'हम जान गए सरकार...', 'धीरे धीरे चल...' ही या चित्रपटातील तीन गाणी हसरतनी लिहिली होती. बाकीची गाणी शैलेंद्रनी.

छोटी बहन(१९५९):

अनाडी, *मैं नशे में हूं*, *कन्हैया*, *उजाला*, *लव्ह मॅरेज*बरोबरच शंकर-जयकिशननी संगीतबद्ध केलेला १९५९चा आणखी एक चित्रपट म्हणजे *छोटी बहन*. *अनाडी*पासून ते *लव्ह मॅरेज*पर्यंत शंकर-जयकिशननी १९५९ साली जे चित्रपट संगीतबद्ध केले त्यात कोणी ना कोणी बडा नायक होता. पण *छोटी बहन* मात्र याला अपवाद होता. या चित्रपटात कोणीही बडा नायक नव्हता. बलराज साहनींची यात प्रमुख भूमिका होती. त्यांच्यावरोबर तेव्हा अस्ताला चाललेला रेहमान आणि उदयाला येत असलेला मेहमूद हे फारसे नाव नसलेले दोन कलाकार या चित्रपटात होते. तरीही शंकर-जयकिशननी हा चित्रपट स्वीकारला होता. कारण सी. रामचंद्र, मदन मोहन, हेमंतकुमार यांच्या वर्चस्वामुळे मद्रासच्या चित्रपटात काही केल्या तेव्हा त्यांना प्रवेशच मिळत नव्हता. हा प्रवेश मिळवण्यासाठी १९५६ साली *चोरी चोरी* हा चित्रपट त्यांनी केला होता. पण हा चित्रपट काही पूर्णपणे मद्रासचा नव्हता. मुंबईचे निर्माते एल. बी. मुद्धा त्यांनी मद्रासच्या ए. व्ही. एम.च्या सहकार्याने निर्माण केलेला हा चित्रपट अर्धा मुंबईचा होता. मुंबईचा शिक्का नसलेला मद्रासचा चित्रपट त्यांना हवा होता. *छोटी बहन*मुळे हा चित्रपट त्यांना मिळाला. या चित्रपटामुळे मद्रासच्या प्रसाद प्रॉडक्शनमध्ये त्यांचा प्रवेश झाला.

१९५७चा *शारदा* प्रसाद प्रॉडक्शनचा पहिला हिंदी चित्रपट. सी. रामचंद्र या चित्रपटाचे संगीतकार होते. पण त्यानंतरच्या *छोटी बहन* या दुसऱ्या चित्रपटात शंकर-जयकिशन यांचा प्रसाद प्रॉडक्शनमध्ये प्रवेश झाला. मग १९६४च्या बेटी बेटेपर्यंत त्यांनी तेथे आपलं असं काही स्थान निर्माण केलं होतं, की अन्य कोणी संगीतकार तेथपर्यंत पोहचू शकत नव्हता. राज कपूरची भूमिका असलेल्या चित्रपटाचे संगीत नियोजन करता करता शंकर-जयकिशननी हिंदी चित्रपट संगीतकारात आपली नायकाच्या गाण्याची एक वेगळी परंपरा निर्माण केली होती. पण *छोटी बहन*मध्ये लोकार्थाने नायक नसल्यामुळे नायकाचं म्हणता येईल, असं एकही गाणं या चित्रपटात नव्हतं. सुरेशकुमार, रहमान यासारखे नगण्य नायक या चित्रपटात असल्यामुळे त्यांच्याहून मेहूमदची गाणीच या चित्रपटात अधिक भाव खाऊन जात होती. नंतरच्या काळात मेहमूद व शुभा खोटे या जोडीने हिंदी चित्रपटात विनोदी जोडीचा एक नवा इतिहास घडवला. *छोटी बहन*मध्येच त्या दोघांची जोडी सर्वात प्रथम जमली आणि त्यांच्यासाठी सुबीर सेन व लता मंगेशकर यांनी गायलेले या चित्रपटातील 'मै रंगीला प्यार का राही...' हे गाणे चांगलेच लोकप्रिय ठरले. मेहमूदची या चित्रपटातील भूमिका एका रिक्षावाल्याची होती. आणि रफीने गायलेले 'मैं रिक्शावाला...' हे गाणे या चित्रपटात त्याच्यावर चित्रित करण्यात आले होते. 'कली अनारकी ना इतना सताओ...' हे या चित्रपटातील गाणे मन्ना डे व आशाबाईंनी गायले होते. आणि ते रेहमान व श्यामा यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. मुकेशने या चित्रपटातील 'जाऊं कहाँ बता ए दिल...' हे गाणे गायले होते. आणि ते रेहमानवर चित्रित करण्यात आले. सुरुवातीला हे गाणे या चित्रपटात नव्हते. काही आठवडे लोटल्यानंतर ते या चित्रपटात समाविष्ट करण्यात आले होते.

'बडी दूरसे आई हूं मैं, तेरा दिल बहलाने...', 'बागो में बहारोंमे इठलाती, गाती...' यासारखी या चित्रपटातील काही गाणी लताबाईंनी गायली होती. पण या चित्रपटातील लताबाईंचे सर्वाधिक लोकप्रिय गाणे होते 'भैया मोरे राखी के बंधन को निभाना...' हे गाणे या चित्रपटात दोन भागात होते. गे व सॅड मूडमध्ये आणि ते या चित्रपटात छोटी बहनची भूमिका करणाऱ्या नंदावर चित्रित करण्यात आले होते. आजही अनेकजण हे गाणे गाऊनच रक्षाबंधन साजरा करतात इतके हे गाणे अजरामर झाले आहे. हसरत व शैलेंद्र या चित्रपटाचे गीतकार होते. 'कली अनारकी...', 'मैं रंगीला प्यार का राही...', 'जाऊं कहाँ बता ए दिल...' ही या चित्रपटातील गाणी हसरतनी लिहिली होती. बाकीची शैलेंद्रनी. ●